दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार, दि. १८ जून २०२६ । वर्ष १ । अंक ७३ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**वरणगावात ‘क्यूआर कोड’ आधारित विवाह नोंदणी!**

(पान २ वर)



» Selected

## ठाकरेंनी डाव उलटवल्याची चर्चा!

मुंबई | प्रतिनिधी : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये मोठ्या फुटीची चर्चा माध्यमातून सुरू असतानाच आता हा विषय पूर्णपणे निकालात निघाल्याचाही दावा केला जात आहे. उद्धव ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांचा डाव उलटवून लावल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. महायुतीकडून ठाकरे गटाचे ६ खासदार फोडण्याची योजना आखल्याचे माध्यमातून गेले काही दिवस सांगितले जात आहे. मात्र, खासदार संजय दिना पाटील आणि ओमराजे निंबाळकर यांनी आपण पक्षाशी एकनिष्ठ असल्याची भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना स्वतंत्र गटासाठी दिलेल्या पत्रात ओमराजे निंबाळकर आणि संजय दिना पाटील यांनी स्वाक्षरीच केले नसल्याचेही सांगितले जात आहे.

### २२ जूनला निकाल, क्रॉस व्होटिंगकडे संपूर्ण राज्याचे लागले लक्ष

# विधान परिषदेच्या 11 जागांसाठी आज मतदान!

## 6 जागा बिनविरोध; उर्वरित ११ मतदारसंघांत महायुती-विरोधकांमध्ये थेट लढत

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील १७ जागांसाठी जाहीर झालेल्या निवडणुकांपैकी सहा जागा बिनविरोध झाल्यानंतर उर्वरित ११ जागांसाठी आज (गुरुवारी) मतदान होत आहे. या निवडणुकांची मतमोजणी २२ जून रोजी होणार असून निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

यंदाची निवडणूक महाविकास आघाडीतील काही उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्याने विशेष चर्चेत राहिली. या घडामोडींमुळे सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले, तर उर्वरित मतदारसंघांत थेट लढती रंगणार आहेत.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या काही खासदारांबाबत सुरू असलेल्या ‘ऑपरेशन टायगर’च्या राजकीय चर्चेच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संभाव्य दगाफटका टाळण्यासाठी महायुतीसह सर्व प्रमुख पक्षांनी आपल्या सदस्यांना




अधिकृत उमेदवारांनाच मतदान करण्याचे निर्देश देत व्हिप जारी केला आहे. व्हिपचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही संबंधित पक्षांकडून देण्यात आला आहे. या निवडणुकीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महापालिकांचे नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

**सोलापूर:** राजेंद्र राऊत (भाजप) विरुद्ध वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी शरद पवार गट)
**जळगाव:** नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) विरुद्ध रेश्मा काळे (बंडखोर)
**सांगली-सातारा:** धैर्यशील कदम (भाजप) विरुद्ध अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी शरद पवार गट) विरुद्ध किशोर धुमाळ (अपक्ष)
**नांदेड:** अमर राजूरकर (भाजप) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस)
**नागपूर :(पोटनिवडणूक):** डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुद्ध अतुल लोंढे
**भंडारा-गोंदिया:** अविनाश ब्राह्मणकर (भाजप) विरुद्ध नरेश ईश्वरकर
**नाशिक:** नरेंद्र दराडे (शिवसेना) विरुद्ध गोकुळ गीते (अपक्ष)
**अमरावती:** प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध हर्षदीप देशमुख (काँग्रेस)
**धाराशिव-लातूर-बीड:** बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)
**परभणी-हिंगोली:** सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर
**छत्रपती संभाजीनगर-जालना:** सुहास शिरसाट (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे)

### बिनविरोध निवडून आलेले उमेदवार

ठाणे मतदारसंघातून रवींद्र फाटक (शिवसेना), रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस), पुण्यातून विक्रम काकडे (राष्ट्रवादी काँग्रेस), यवतमाळमधून दुष्यन्त चतुर्वेदी (शिवसेना), वर्धा-गडचिरोली-चंद्रपूरमधून अरुण लखानी (भाजप) आणि अहिल्यानगरमधून प्राजक्त तनपुरे (भाजप) हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. आता उर्वरित ११ मतदारसंघांतील मतदान आणि त्यानंतर २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीत कोण बाजी मारणार, याकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## जिजाऊंचे संस्कार हा राष्ट्राचा अमूल्य वारसा

### पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे वक्तव्य

**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी/धरणगाव/जळगाव, | प्रतिनिधी:** हिंदू सूर्य, वीरशिरोमणी महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त जीपीएस स्कूल कॅम्पस, पाळधी येथे आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, महाराणा प्रताप हे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे जिवंत प्रतीक होते.

मातृभूमीच्या रक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला आणि कोणत्याही परिस्थितीत तडजोड केली नाही. त्यांचे जीवन आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संदेश देणारे आहे. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रप्रेम, स्वाभिमान आणि न्यायनिष्ठेचे संस्कार दिले. त्यांच्या दूरदृष्टी, त्याग



आणि कर्तृत्वामुळेच स्वराज्याची भक्कम पायाभरणी झाली. समाजाला योग्य दिशा देणारे त्यांचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत.

"महाराणा प्रतापांचा स्वाभिमान आणि जिजाऊंचे संस्कार हा आपल्या इतिहासाचा अमूल्य वारसा आहे. या दोन्ही महान विभूतींचे विचार अंगीकारणे हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल," असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास शाळेचे चेअरमन विक्रम पाटील, जीपीएस स्कूल कॅम्पसचे समन्वयक डी. डी. कंखरे, कॉलेजचे प्राचार्य अजिंक्य जोशी, नरेंद्र मांडगे, नवलसिंग पाटील, बंडूदादा नारखेडे, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राचार्य अजिंक्य जोशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन जीपीएस स्कूलचे समन्वयक डी. डी. कंखरे यांनी मानले.

---

## ठाकरे गटाला मोठा धक्का? सहा खासदारांच्या बंडाची चर्चा

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची चिन्हे दिसू लागली असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील काही खासदारांच्या संभाव्य बंडामुळे चर्चांना उधाण आले आहे. पक्षाचे तब्बल सहा खासदार वेगळा गट स्थापन करून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दिल्लीत सुरू असलेल्या या हालचालींच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून, दरम्यान, या सर्व घडामोडींना ‘ऑपरेशन टायगर’ असे नाव देण्यात येत असून, त्याची राजकीय चर्चा राज्यभर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार आणि नेते संजय राऊत यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेत भाजप आणि शिंदे गटावर गंभीर आरोप केले.

---

## मा. भवरलालभाऊ जैन वाचनालयात महाराणा प्रताप जयंती

**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव येथील मा. भवरलालभाऊ जैन सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या वतीने बुधवारी (दि. १७ जून २०२६) शूरवीर योद्धे महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात वाचनालयाचे सचिव योगेश पी. पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी



उपस्थितांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठ कार्याला अभिवादन केले. महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील, माजी नगरसेवक नंदकिशोर पाटील, देविदास माळी, सुरज गुप्ता, रवींद्र घारोटे, साहेबराव पाटील, मयूर पाटील आणि रघुनंदन वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात महाराणा प्रताप यांच्या पराक्रमाचा आणि स्वाभिमानी जीवनाचा आदर्श समाजाने जपण्याची गरज व्यक्त करण्यात आली. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

---

## अतिक्रमणावर कारवाईसाठी वर्षभर पाठपुरावा

### संतप्त कुटुंबाचा मनपा आयुक्तांच्या दालनात आत्मदहनाचा प्रयत्न

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** देवपूर परिसरातील रस्त्यात अडथळा ठरणाऱ्या कथित अतिक्रमणाविरोधात गेल्या वर्षभरापासून पाठपुरावा करूनही महापालिका प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत संतप्त झालेल्या नितीन शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांनी महापालिका आयुक्तांच्या दालनाबाहेर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. पोलिस व महापालिका अधिकाऱ्यांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी तातडीने संबंधित प्रकरणाची दखल घेत अतिक्रमणाची मोजणी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मनपा अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन मोजणीची प्रक्रिया सुरू केली. मिळालेल्या माहितीनुसार, देवपूरातील वीर सावरकर रस्त्यावर राहणारे नितीन शिंदे यांनी परिसरातील रस्ता अतिक्रमणामुळे बाधित झाल्याची तक्रार अनेक महिन्यांपूर्वी महापालिकेकडे केली होती. संबंधित अतिक्रमण हटविण्याची वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी कारवाई झाली नसल्याने त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. आत्मदहनाचा प्रयत्न रोखल्यानंतर प्रशासनाने अतिक्रमणाची संयुक्त मोजणी सुरू



केली. मात्र, केवळ तक्रारीतील जागेपुरतीच नव्हे तर तक्रारदार नितीन शिंदे यांच्या घराचीही मोजणी करण्यात आल्याने परिसरात नव्या चर्चांना उधाण आले. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. महापालिकेच्या पथकाने दोन्ही बाजूंच्या जागांची पाहणी करून मोजणी पूर्ण केली असून, आवश्यक असल्यास तक्रारदाराच्या मालमत्तेतील कथित अतिक्रमणाबाबतही कारवाई होऊ शकते, असे संकेत संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, वर्षभराच्या पाठपुराव्यानंतर आत्मदहनाच्या प्रयत्नामुळे प्रशासन हलले का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आता मोजणी अहवालाच्या आधारे महापालिका कोणती कारवाई करते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

## म्हसावद प्रकल्पात अंगणवाडी मदतनीस पदांसाठी मेगा भरती

**जन सम्राट टाईम्स**

**शहादा | प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील महिलांसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली असून, एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, म्हसावद यांच्या अधिपत्याखालील विविध अंगणवाडी केंद्रांमध्ये अंगणवाडी मदतनीस पदांची भरती जाहीर करण्यात आली आहे. ही नियुक्ती एकत्रित मानधन तत्त्वावर सरळ पद्धतीने करण्यात येणार असून पात्र व इच्छुक महिला उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले आहेत. या भरती प्रक्रियेत शहादा तालुक्यातील कलमाडी, वडगाव, आसुस, जवखेडा, उंटावद, खेडदिगर आणि बाबदेवपाडा या महसुली गावांमधील प्रत्येकी एका अशा एकूण सात अंगणवाडी मदतनीस पदांसाठी भरती करण्यात येणार आहे. अर्जदार महिला उमेदवार किमान इयत्ता १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असून ती संबंधित अंगणवाडी केंद्र असलेल्या गावाची, वाडीची किंवा वस्तीची स्थानिक रहिवासी असणे बंधनकारक आहे. यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याचा रहिवासी दाखला तसेच स्वयंघोषणापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहणार आहे. उमेदवारांचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय ३५ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. विधवा महिलांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षांपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. वयाच्या पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा दहावीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार आहे. शासनाच्या नियमानुसार उमेदवाराला दोनपेक्षा जास्त हयात अपत्ये नसावीत तसेच त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मराठी भाषेचे वाचन व लेखनाचे ज्ञान असणेही अनिवार्य राहणार आहे. या भरती प्रक्रियेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही लेखी परीक्षा किंवा मुलाखत घेतली जाणार नाही.




उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक व इतर पात्रता कागदपत्रांच्या आधारे शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार गुणांकन केले जाईल. बारावीचे गुण, पदवी, पदव्युत्तर शिक्षण, डी.एड./बी.एड., संगणक पात्रता, विधवा किंवा अनाथ प्रवर्ग, मागासवर्गीय आरक्षण तसेच अनुभव या बाबींच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार आहे. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया १६ जून २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत सुरू राहणार असून इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज कार्यालयीन वेळेत स्वतः उपस्थित राहून बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, प्रकल्प म्हसावद, ता. शहादा, जि. नंदुरबार येथे सादर करावेत. अंतिम मुदतीनंतर किंवा पोस्टाद्वारे प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. दरम्यान, ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने आणि गुणवत्तेच्या आधारे राबविण्यात येणार असून कोणत्याही अफवा किंवा भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी सागर चौधरी यांनी केले आहे.

### १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक

अर्जदार महिला उमेदवार किमान इयत्ता १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असून ती संबंधित अंगणवाडी केंद्र असलेल्या गावाची, वाडीची किंवा वस्तीची स्थानिक रहिवासी असणे बंधनकारक आहे. यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याचा रहिवासी दाखला तसेच स्वयंघोषणापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहणार आहे.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## स्वतःची अंत्ययात्रा काढून शेतकऱ्याची थेट विहिरीत उडी

### नंदुरबारमधील आंदोलनाने प्रशासन हादरले ; विहिरीत तासभर जलतरंग योगाभ्यास

**जन सम्राट टाईम्स**

**नंदुरबार | प्रतिनिधी :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ मधील जाचक अटींच्या निषेधार्थ आणि सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी नंदुरबार जिल्ह्यातील सैताणे गावात एका शेतकऱ्याने अत्यंत अनोखे व थरारक आंदोलन छेडले. शेतकरी प्रमोद दगडू पाटील यांनी प्रथम स्वतःची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढली आणि त्यानंतर थेट विहिरीत उडी घेत जवळपास तासभर जलतरंग योगाभ्यास करून शासनाचे लक्ष वेधून घेतले.

मंगळवारी (दि. १६ जून) सकाळी गावातील विठ्ठल मंदिर परिसरातून शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत प्रमोद पाटील यांची



प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. गावातील प्रमुख मार्गाने निघालेली ही अंत्ययात्रा विहिरीजवळ पोहोचताच त्यांनी तिरडीवरून उठून थेट विहिरीत उडी घेतली. त्यानंतर विहिरीच्या पाण्यावर तरंगत त्यांनी सुमारे एक तास योगाभ्यास करत आंदोलन सुरू ठेवले.

हा अनोखा प्रकार पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस दलाने घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात केला. पोलीस अधिकारी आणि महसूल विभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र, जिल्हाधिकारी स्वतः घटनास्थळी येईपर्यंत विहिरीतून बाहेर येणार नसल्याची भूमिका प्रमोद पाटील यांनी घेतली. यावेळी काही काळ पोलीस आणि आंदोलनस्थळी उपस्थित ग्रामस्थांमध्ये शाब्दिक वादही झाला.

या आंदोलनातून शेतकऱ्यांनी राज्य सरकारसमोर चार प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ मधील सर्व जाचक अटी व निकष रद्द करून पात्र-अपात्र भेद संपुष्टात आणणे, राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा करणे, शेतकऱ्यांवरील सर्व प्रकारची कर्जवसुली तातडीने स्थगित करणे आणि केवळ एक रुपयात प्रभावी पीक विमा योजना लागू करणे या मागण्यांचा समावेश आहे. अखेर प्रशासनाच्या समजुतीनंतर प्रमोद पाटील विहिरीबाहेर आले.

त्यानंतर त्यांनी नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. जिल्हाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर आणि प्रशासनाने मागण्यांवर विचार करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आपले आंदोलन २२ जूनपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. शासनाने या कालावधीत शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय न घेतल्यास पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही प्रमोद पाटील आणि उपस्थित शेतकऱ्यांनी दिला आहे.

### परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी

सैताणे येथे झालेल्या या अनोख्या आंदोलनाची चर्चा आता जिल्हाभर सुरू असून, कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारची भूमिका काय राहणार याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे. विहिरीच्या पाण्यावर तरंगत त्यांनी सुमारे एक तास योगाभ्यास करत आंदोलन सुरू ठेवले. हा अनोखा प्रकार पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस दलाने घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात केला. पोलीस अधिकारी आणि महसूल विभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

# आयुध निर्माणी कर्मचारी सेवानिवृत्तीपर्यंत केंद्रीय सेवेतच!

## संरक्षण मंत्रालयाचा निर्णय; निगमीकरणानंतरही सेवा अटी कायम

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** देशभरातील आयुध निर्माण (ऑर्डनन्स फॅक्टरी) कर्मचाऱ्यांसाठी संरक्षण मंत्रालयाने अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. संरक्षण उत्पादन विभागाने १५ जून २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार, निगमीकरणानंतरही संरक्षण सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमध्ये (DPSU) सहभागी होण्यास इच्छुक नसलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीपर्यंत केंद्रीय सरकारी कर्मचारी म्हणूनच सेवेत कायम ठेवण्यात येणार आहे. या निर्णयामुळे देशभरातील सुमारे ६२ हजार कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, अशा कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने डीपीएसयूमध्ये समाविष्ट केले जाणार नाही. त्यांच्या विद्यमान सेवा अटी, वेतनमान, पदोन्नती, विविध भत्ते, वैद्यकीय सुविधा, रजा तसेच इतर




सर्व शासकीय लाभ पूर्ववत राहणार आहेत. केंद्र सरकारने १ ऑक्टोबर २०२१ रोजी देशातील ४१ आयुध निर्माणींचे सात संरक्षण सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला होता.

या निर्णयाला सुरुवातीपासूनच अखिल भारतीय संरक्षण कर्मचारी महासंघ (AIDEF) तसेच त्यांच्या संलग्न संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला होता. महासंघाचे राष्ट्रीय सचिव सी. श्रीकुमार यांनी या निगमीकरणाविरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याशिवाय विविध शासकीय स्तरांवर पत्रव्यवहार, आंदोलने, उपोषणे आणि युनायटेड फ्रंट ऑफ ऑर्डनन्स एम्प्लॉईजच्या माध्यमातून सातत्याने लढा उभारण्यात आला होता. संरक्षण मंत्रालयाच्या नव्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवा अटींमध्ये कोणताही बदल होणार नसून, त्यांना पूर्वीप्रमाणेच सर्व शासकीय सुविधा उपलब्ध राहतील. विशेष म्हणजे, या प्रक्रियेसाठी देण्यात आलेली मुदत वाढवून आता ३१ मार्च २०२७ पर्यंत करण्यात आली आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे देशभरातील आयुध निर्माणी कर्मचाऱ्यांनी स्वागत केले असून, गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या संघटनात्मक संघर्षाला अखेर यश आल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

आंदोलन, न्यायालयीन लढाई आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच केंद्र सरकारला हा निर्णय घ्यावा लागल्याचे कर्मचारी संघटनांचे मत आहे. ऑर्डनन्स फॅक्टरी कामगार युनियन (AIDEF) चे महासचिव दिनेश राजगिरे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना, "हा कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा आणि दीर्घकालीन संघर्षाचा विजय असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा महत्त्वपूर्ण टप्पा आहे," अशी प्रतिक्रिया दिली. संरक्षण मंत्रालयाच्या या निर्णयामुळे देशातील हजारो कर्मचाऱ्यांमधील अनिश्चिततेचे वातावरण दूर झाले असून, त्यांच्या भविष्यासंदर्भातील मोठी चिंता आता निवळल्याचे चित्र आहे.

### सर्व शासकीय लाभ पूर्ववत राहणार

संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, अशा कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने डीपीएसयूमध्ये समाविष्ट केले जाणार नाही. त्यांच्या विद्यमान सेवा अटी, वेतनमान, पदोन्नती, विविध भत्ते, वैद्यकीय सुविधा, रजा तसेच इतर सर्व शासकीय लाभ पूर्ववत राहणार आहेत. केंद्र सरकारने १ ऑक्टोबर २०२१ रोजी देशातील ४१ आयुध निर्माणींचे सात संरक्षण सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला सुरुवातीपासूनच अखिल भारतीय संरक्षण कर्मचारी महासंघ (AIDEF) तसेच त्यांच्या संलग्न संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला होता. महासंघाचे राष्ट्रीय सचिव सी. श्रीकुमार यांनी या निगमीकरणाविरोधात मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याशिवाय विविध शासकीय स्तरांवर पत्रव्यवहार, आंदोलने, उपोषणे आणि युनायटेड फ्रंट ऑफ ऑर्डनन्स एम्प्लॉईजच्या माध्यमातून सातत्याने लढा उभारण्यात आला होता. संरक्षण मंत्रालयाच्या नव्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवा अटींमध्ये कोणताही बदल होणार नसून, त्यांना पूर्वीप्रमाणेच सर्व शासकीय सुविधा उपलब्ध राहतील.

# अवैध हातभट्टी दारूविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक मोहीम

## १८ दिवसांत १३८ गुन्हे, ८९ आरोपी अटकेत

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी** : हडपसर (पुणे) येथे अवैध हातभट्टी दारूमुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धुळे जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती आणि विक्रीविरोधात व्यापक धडक मोहीम हाती घेतली आहे. "शून्य सहनशीलता" या धोरणानुसार राबविण्यात आलेल्या विशेष कारवाईत अवघ्या १८ दिवसांत १३८ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे आणि विभागीय उपआयुक्त उषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक स्वाती काकडे यांच्या नेतृत्वात धुळे जिल्ह्यातील चार विशेष पथकांनी ही मोहीम राबविली. २८ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २४ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त तसेच नष्ट करण्यात आला. या मोहिमेदरम्यान गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे तब्बल ५४ हजार ५०५ लिटर कच्चे रसायन, २ हजार २८६ लिटर हातभट्टी दारू आणि २ हजार १३२ लिटर ताडी नष्ट करण्यात आली. याशिवाय ६३ बल्क लिटर देशी व विदेशी मद्य जप्त करण्यात आले



असून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही उद्ध्वस्त करण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाने धुळे जिल्ह्यातील संवेदनशील गावे, नदी-नाले व तलाव परिसर तसेच डोंगराळ भागांमध्ये अचानक छापेमारीची तीव्रता वाढविली आहे. अवैध हातभट्टी दारू निर्मितीबरोबरच बेकायदेशीर मद्य विक्री आणि वाहतुकीविरोधातही सातत्याने कारवाई करण्यात येत असल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, नागरिकांनी अवैध मद्यनिर्मिती, विक्री किंवा वाहतूक यासंदर्भात कोणतीही माहिती अथवा तक्रार असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अवैध हातभट्टी दारूमुळे होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी आणि जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी ही विशेष मोहीम आगामी काळातही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

### 63 बल्क लिटर देशी व विदेशी मद्य जप्त

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे आणि विभागीय उपआयुक्त उषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक स्वाती काकडे यांच्या नेतृत्वात धुळे जिल्ह्यातील चार विशेष पथकांनी ही मोहीम राबविली. २८ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण २४ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त तसेच नष्ट करण्यात आला. या मोहिमेदरम्यान गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे तब्बल ५४ हजार ५०५ लिटर कच्चे रसायन, २ हजार २८६ लिटर हातभट्टी दारू आणि २ हजार १३२ लिटर ताडी नष्ट करण्यात आली. याशिवाय ६३ बल्क लिटर देशी व विदेशी मद्य जप्त करण्यात आले असून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही उद्ध्वस्त करण्यात आले.


जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# पूजा कॉम्प्लेक्स परिसर ठरला ‘टँकरमुक्त’!

## आठ वर्षांपासून नियमित पाणीपुरवठा

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी** : भुसावळ शहरालगत असलेल्या पूजा कॉम्प्लेक्स परिसराने लोकसहभागातून उभारलेल्या ग्रामदानी पाणी योजनेच्या बळावर पाणी व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केला आहे. गेल्या आठ ते नऊ वर्षांपासून या परिसरातील नागरिकांना नियमित पिण्याचे पाणी मिळत असून, एकदाही टँकरची गरज भासलेली नाही. स्थानिक नागरिकांनी एकत्र येत स्वतःच्या पुढाकारातून ही स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरू केली. या योजनेच्या प्रभावी नियोजनामुळे परिसरातील प्रत्येक घराला स्वतंत्र नळजोडणी उपलब्ध करून देण्यात आली असून पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कार्यकारी मंडळ सातत्याने कार्यरत असते. योजनेच्या देखभालीसाठी प्रत्येक कुटुंबाकडून वार्षिक नाममात्र १,५०० रुपयांची वर्गणी घेतली जाते. या निधीतून कर्मचारी वेतन, वीजबिल तसेच पाणी योजनेच्या दैनंदिन देखभाल व संचालनाचा खर्च भागविला जातो. या उपक्रमामुळे पूजा कॉम्प्लेक्स परिसराला आज



‘टँकरमुक्त परिसर’ अशी ओळख मिळाली आहे. विशेष म्हणजे तीव्र उन्हाळ्याच्या काळातही येथील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत नाही किंवा टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत नाही.

### ही योजना इतर भागांसाठीही प्रेरणादायी

नागरिकांनाही या व्यवस्थेचे समाधान आहे लोकसहभाग, पारदर्शक नियोजन आणि जबाबदारीची भावना यांच्या जोरावर उभी राहिलेली ही योजना इतर भागांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे सामूहिक प्रयत्नांतून स्थानिक पातळीवर पाणीप्रश्नावर प्रभावी उपाय कसा उभा राहू शकतो, याचे पूजा कॉम्प्लेक्स परिसर हे एक यशस्वी उदाहरण मानले जात आहे.

# महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मान्यवरांची प्रेरणादायी उपस्थिती

## शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसह सर्वांगीण विकासासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला मार्गदर्शनाचा संदेश

जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** महाराणा प्रताप शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संचलित महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देवपूर, धुळे येथे संस्थेच्या पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत एक प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि संस्थेच्या भावी वाटचालीबाबत सकारात्मक विचार मांडण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री नरेंद्रसिंह (नानासाहेब) सिसोदिया, स्कूल कमिटीचे चेअरमन मा. श्री विजयसिंह (नानासाहेब) सूर्यवंशी, वाईस चेअरमन मा. श्री प्रकाशसिंह (बापूसाहेब) जाधव, संचालिका सौ. नीताताई सिसोदिया तसेच संचालक प्रा. जसपालसिंह सिसोदिया यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विद्यालयाचे



प्राचार्य डॉ. किशोर अरगडे यांनी संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा मांडला. गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संस्कार आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी इंद्रजीत जमादार, सोनाली सिसोदिया, योगेश शिंदे, संगीता कुवर, अनिता राजपूत, मीनल राठोड, रवींद्र राजपूत, निलेश राजपूत, गजेंद्र पावरा, रवींद्र गिरासे, गोविंद राजपूत आणि देवराम सोमवंशी यांच्यासह मनसेचे संतोष मामा मिस्तरी रावसाहेब कदम संदीप जडे, नगरसेवक सनी माजी महापौर चंद्रकांत सोनार जगदीश राणा, राजपूत समाज आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच शिस्त, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले. संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करत भविष्यातही अशाच विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# कढोलीत चार दिवसांत दोन डीपी जळाल्या; ओव्हरलोडमुळे ग्रामस्थ हैराणठ

जन सम्राट टाईम्स

**कढोली। प्रतिनिधी** : कढोली गावातील वीज वितरण व्यवस्थेवरील वाढत्या ओव्हरलोडचा फटका थेट नागरिकांना बसत असून, अवघ्या तीन ते चार दिवसांच्या कालावधीत दोन डीपी (ट्रान्सफॉर्मर) जळाल्याने गावाचा वीजपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. तीव्र उकाड्याच्या पार्श्वभूमीवर वीज नसल्याने ग्रामस्थांना अक्षरशः रात्र जागून काढावी लागत असून, पाणीपुरवठाही ठप्प झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहिला ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी महावितरणकडून नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला. मात्र, वाढलेल्या भारामुळे हा ट्रान्सफॉर्मरही अवघ्या एका रात्रीत निकामी झाला. सध्या जळालेला ट्रान्सफॉर्मर डीपीवर तसाच असून, तो बदलण्यासाठी कोणतीही ठोस हालचाल होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सलग तिसऱ्या दिवसापासून वीजपुरवठा खंडित असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. उकाड्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांची विशेष गैरसोय होत असून, घरगुती कामकाज तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने गावाचा पाणीपुरवठाही विस्कळीत झाला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून, अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावाच्या वापरासाठी असलेल्या डीपीवर गावातील पाणीपुरवठा करणाऱ्या मोटारींसह शेतीच्या सात ते आठ विद्युत मोटारी जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे ट्रान्सफॉर्मरवर सतत अतिरिक्त भार येत असून वारंवार बिघाड होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याच ओव्हरलोडमुळे अल्पावधीत दोन ट्रान्सफॉर्मर जळाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या संदर्भात संबंधित वीज वितरण विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता प्रतिसाद मिळाला नसल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे प्रशासनाविषयी नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतीपंपांसाठी स्वतंत्र डीपी बसविण्यात यावी, गावासाठी स्वतंत्र आणि सक्षम वीजपुरवठा व्यवस्था उभारावी तसेच जळालेला ट्रान्सफॉर्मर तातडीने बदलून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी महावितरणने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# वरणगावात ‘क्यूआर कोड’ आधारित विवाह नोंदणी!

## वेळ, पैसा आणि गैरसोय वाचणार



जन सम्राट टाईम्स

**वरणगाव | प्रतिनिधी:** वरणगाव नगरपरिषद हद्दीतील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता, शहरात तातडीने ‘क्यूआर (QR) कोड आधारित आधुनिक विवाह नोंदणी सेवा’ सुरू करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने वरणगाव नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सध्या वरणगाव नगरपरिषद क्षेत्रात विवाह नोंदणीची थेट आणि स्थानिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना नोंदणीसाठी इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे वेळेचा अपव्यय, अतिरिक्त आर्थिक खर्च आणि प्रशासकीय गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विवाह नोंदणी प्रक्रियेलाही आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन ‘क्यूआर कोड’ आधारित डिजिटल प्रणाली कार्यान्वित करण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांनी अधोरेखित केले आहे.

डिजिटल विवाह नोंदणीचे संभाव्य फायदे नागरिकांना स्थानिक पातळीवरच विवाह नोंदणीची सुविधा उपलब्ध होईल. क्यूआर कोडयुक्त डिजिटल प्रमाणपत्रामुळे प्रमाणपत्राची सत्यता सहज पडताळता येईल. बनावट कागदपत्रांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. विवाह नोंदणीचे संगणकीकरण झाल्याने नोंदींचे डिजिटल जतन व व्यवस्थापन अधिक सुलभ होईल.

नगरपरिषदेच्या ई-गव्हर्नन्स उपक्रमाला चालना मिळून प्रशासन अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनेल.

निवेदन स्वीकारल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत विषयाचा गांभीर्याने विचार करून विवाह नोंदणी प्रक्रिया सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी मान्यवरांची उपस्थिती निवेदन सादर करताना वरणगावचे लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनीलभाऊ काळे, सामाजिक कार्यकर्ते मिलिंददादा मेढे, नगरसेवक नानाभाऊ चौधरी, प्रकाश चौधरी, कुंदन माळी, तेजस जैन, योगेश महाजन, फजल भाई, दादू पालवे, दुर्गेश चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. वरणगावात डिजिटल सुविधांचा विस्तार करून नागरिकांना अधिक सुलभ आणि पारदर्शक सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही मागणी महत्त्वाची मानली जात असून, प्रशासन यावर कोणता निर्णय घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# पत्रकार पाल्य व गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय साहित्य वाटप

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, जळगाव जिल्हा व प्रज्ञावंत फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या जळगाव जिल्हा शाखा आणि प्रज्ञावंत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार पाल्य तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत जळगाव



जिल्ह्यातील इयत्ता १ ली ते १० वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या पत्रकार पाल्य व गरजू विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, कंपास बॉक्स, पेन्सिल किट तसेच अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील शैक्षणिक खर्चाचा भार कमी व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी विद्यार्थ्याचे नाव, इयत्ता, शाळेचे नाव, अलीकडील मार्कशीट, पालकांचे नाव आणि संपर्क क्रमांक ही माहिती व्हॉट्सॲपद्वारे ९०२१९६९१०० या क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि स्थळ याबाबत स्वतंत्रपणे माहिती दिली जाणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. जळगाव जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकार पाल्य आणि गरजू विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई व प्रज्ञावंत फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत जळगाव जिल्ह्यातील इयत्ता १ ली ते १० वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या पत्रकार पाल्य व गरजू विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, कंपास बॉक्स,आवश्यक शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील शैक्षणिक खर्चाचा भार कमी व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306